गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३५ वा ● मंगळवार ०३ ऑक्टोबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 135 | Date : 03/10/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## तेव्हाही ते गरिबांच्या भावनांशी खेळायचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काँग्रेसवर टीका

ग्वाल्हेर : देशाने विकासविरोधी लोकांना सहा दशके दिली होती. एवढी कामे ९ वर्षात होऊ शकतात, तर ६० वर्षांत किती कामे झाली असती. ते काहीच करू शकले नाहीत, हे त्यांचे अपयश आहे. तेव्हाही ते गरिबांच्या भावनांशी खेळायचे, आजही ते गरिबांच्या भावनांशी खेळत आहेत. तेव्हाही ते जातीच्या नावावर समाजात फूट पाडायचे आणि आजही तेच पाप करत आहेत. तेव्हाही ते भ्रष्टाचारात बुडाले होते आणि आजही ते भ्रष्टाचारात बुडाले आहेत, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर केला. या वर्षाच्या अखेरीस मध्य प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहेत. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी राज्याच्या दौऱ्यावर आहेत.

सोमवारी त्यांनी ग्वाल्हेरमध्ये राज्यासाठी १९,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यावेळी त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. पंतप्रधान पुढे म्हणाले, काँग्रेसच्या 'घमंडिया' आघाडीचे नेते महिलांबद्दल किती अपमानास्पद गोष्टी बोलत आहेत, हे आपण रोज पाहत आहोत. महिलांना त्यांचे हक्क मिळावेत असे त्यांना वाटत नाही, म्हणूनच ते अशी वक्तव्ये करतात. ते समाजाला जातीत विभागण्याचे



काम करत आहेत. ते धर्माच्या नावाने गोंधळ घालत आहेत. देशाच्या प्रगतीचा द्वेष करणे, एवढेच काम ते करतात, अशी टीकाही त्यांनी यावेळी केली. महिला आरक्षणावर बोलताना पंतप्रधान म्हणाले, अनेक सरकारे आली, लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचे खोटे आश्वासन देऊन आमच्या महिलांकडे वारंवार मते मागितली. पण त्यांनी कधीही कायदा बनवला नाही. संसदेत मोदीने हमी दिली आणि आज 'नारीशक्ती कायदा' प्रत्यक्षात आला आहे, असेही मोदी यावेळी म्हणाले.

## ठाण्यानंतर आता नांदेड हादरलं! शासकीय रुग्णालयात चोवीस तासात २४ जणांचा मृत्यू

### १२ नवजात बालकांचा मृतात समावेश

नांदेड : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे शहराच्या महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात एका रात्रीत तब्बल १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, आता नांदेड शहरातील शासकीय रुग्णालयात चोवीस तासात २४ जणांचा मृत्यू झाला आहे. धक्कादायक म्हणजे यात १२ नवजात बालकांचा समावेश आहे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा निर्माण झाला असून, वेळेवर औषधे पुरवठा झाला नसल्याने रुग्णांना आपला जीव गमवावा लागला असल्याचा आरोप केला जात आहे.

हाफकीनने औषधी खरेदी बंद केल्यामुळे राज्यभरातील शासकीय रुग्णालयात औधधांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. अत्यवस्थ रुग्णांना वेळेत औषधे पुरवठा होत नसल्याने जीव गमवावा लागत असल्याचा आरोप केला जात आहे. असाच धक्कादायक प्रकार नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयात पुढे आला आहे. गेल्या २४ तासात २४ रुग्णांचा रुग्णालयात मृत्यू झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे यात १२ नवजात बालकांचाही मृतात समावेश आहे. या घटनेमुळे आरोग्य यंत्रणेची लक्तरे वेशीवर टांगल्या गेली आहेत. दरम्यान यावर रुग्णालय प्रशासनाने प्रतिक्रिया दिली असून, या प्रकरणी शासकीय रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी मृतांध्ये बाहेरच्या रुग्णाचा जास्तीचा समावेश होता असा दावा केला आहे. या घटनेमुळे नांदेडमध्ये एकच खळबळ उडाली असून, या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी होतेय.

दरम्यान नांदेड येथील घडलेल्या घटनेच्या संदर्भात चौकशी समिती नेमली जाणार असल्याची माहिती वैद्यकीय मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली आहे. सोबतच आपण स्वतः रुग्णालयात जाऊन पाहणी करणार असल्याचे देखील मुश्रीफ म्हणाले आहेत. तर, हे सर्व प्रकरण नेमकं काय आहे हे चौकशी केल्याशिवाय समजणार नाही. आमचे आयुक्त तत्काळ आजच तिकडे निघणार आहे. तसेच मी देखील उद्या जाऊन सर्व घटनेचा आढावा घेणार असल्याचे, मुश्रीफ म्हणाले आहेत.




**मृतांमध्ये कोणाचा समावेश?**

* नांदेडच्या शासकीय रुग्णालयात २४ तासांत २४ रुग्णांचा मृत्यू * मृतांमध्ये १२ नवजात बालकांचा समावेश आहे. * ४८ तासांत जन्माला आलेले ६ तर २४ तासांत जन्माला आलेल्या ६ बालकांचा मृत्यू * सर्पदंशावर उपचार घेणाऱ्या दोघांचा मृत्यू झाला आहे. * वेगवेगळ्या गंभीर आजारांमुळे यातील ७ जणांचा मृत्यू झाला आहे. * प्रसूतीवेळी एका महिलेचा मृत्यू झाला आहे. * तसेच हृदयविकाराच्या झटक्याने दोन रुग्णांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्य, भजनातून समाजाला दिशा दिली : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वर्धा : राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा काळ पारतंत्र्य, रुढी, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धेचा काळ होता. समाजात असमानता तर तरुणाई भरकटलेल्या अवस्थेत होती. अशा स्थितीत राष्ट्रसंतांनी तरुणांना भजनाद्वारे प्रबोधनातून मोहीत केले. संपूर्ण समाजाला दिशा देण्याचे काम त्यांनी केले, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.


हिंगणघाट तालुक्यातील श्रीक्षेत्र आजनसरा येथे श्रीसंत भोजाजी महाराज




देवस्थान व अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमच्यावतीने आयोजित राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज साहित्य संमेलनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्याहस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी खासदार रामदास तडस, आमदार रामदास आंबटकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष आमदार समीर कुणावार, आमदार डॉ.अशोक उईके, किर्तीकुमार भांगडीया, संजिवरेड्डी बोदकुरवार, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलिस अधीक्षक नूरूल हसन, गुरुवर्य महंत सुरेश शरणजी शास्त्री महाराज, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सरिता गाखरे, नितीन मडावी, । पान २ वर

## पुरीतील जगन्नाथ मंदिराची श्रीमंती! ७ राज्यांमध्ये ६०८२२ एकर जमीन; संपत्तीबाबत मोठी माहिती

ओदिशा : ओदिशातील पुरी येथील जगन्नाथ मंदिर भारतातील प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. भगवान विष्णूच्या जगन्नाथ मंदिरात देश-विदेशातून भक्तगण आणि पर्यटक दर्शनासाठी येत असतात. भगवान जगन्नाथ मंदिराच्या संपत्तीबाबत मोठी मोहिती समोर आली आहे. जगन्नाथ मंदिर ट्रस्टकडे ७ राज्यांमध्ये ६० हजारहून जास्त एकर जमीन असल्याची माहिती समोर आली आहे. ओदिशासह ७ राज्यांमध्ये ही जमी आहे.



भगवान जगन्नाथ मंदिराकडे ६०८२२ एकर जमीन असल्याचा मोठा खुलासा ओदिशाचे कायदा मंत्री जगन्नाथ सरका यांनी केला आहे. पुरीच्या जगन्नाथ मंदिराजवळील ही जमीन ओडिशा आणि इतर ६ राज्यांमध्ये पसरलेली आहे. राज्य विधानसभेत बीजेडी आमदाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

ओडिशाचे कायदा मंत्री जगन्नाथ सरका यांनी विधानसभेत दिलेल्या माहिती दिली की पुरी येथील जगन्नाथ मंदिराची ओडिशा आणि इतर सहा राज्यांमध्ये ६०,८२२ एकर जमीन आहे. बीजेडी सदस्य प्रशांत बेहरा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात त्यांनी याबाबत माहिती दिली आहे. ओडिशाच्या ३० जिल्ह्यांपैकी २४ जिल्ह्यांमध्ये महाप्रभू जगन्नाथ बीजे, श्रीक्षेत्र पुरी ट्रस्टच्या। पान २ वर

## राष्ट्रपिता महात्मा गांधींना पंतप्रधान मोदींचं नमन, 'बापूंची स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण वचनबद्ध'

नवी दिल्ली : देशभरात राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीआणि लाल बाहदूर शास्त्री जयंती मोठ्या साजरी केली जात आहे. यानिमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि लाल बाहदूर शास्त्री जयंती निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन्ही नेत्यांना आदरांजली दिली आहे. या दोन्ही नेत्यांनी देशाच्या विकासासाठी अमूल्य योगदान दिलं असून त्यांच्या विचाराने प्रेरित होण्याची गरज असल्याचं



पंतप्रधानांनी यावेळी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर यासंदर्भात पोस्टही शेअर केली आहे.

पंतप्रधान मोदी यांनी या पोस्टमध्ये लिहिलं आहे की, 'गांधी जयंतीनिमित्त मी महात्मा गांधींना नमन करतो. त्यांची काळातीत शिकवणीमुळे आमचा मार्गातील अंधार दूर झाला. महात्मा गांधींचा प्रभाव जागतिक पातळीवर असून, यामुळे संपूर्ण मानवजातीला एकता आणि करुणेची भावना पुढे नेण्यासाठी प्रेरणा मिळते. एकता आणि सुसंवाद वाढण्याचं त्यांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू या. त्यांचे विचार प्रत्येक तरुणातील बदलासाठी सक्षम आहेत.' पान २ वर

## लातूर जिल्ह्यात पुन्हा भूकंप, हासोरी भागात तीन भूकंपाचे धक्के

लातूर : जिल्ह्यातील हासोरी भागात सौम्य भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. किल्लारी भूकंपाच्या घटनेला कालच तीस वर्षे पूर्ण झाली असतांना, आज हासोरी भागात सकाळी सौम्य धक्का बसल्यामुळे नागरिक भयभीत आहेत. निलंगा तालुक्यातील हसोरी बु. आणि हासोरी खु. परिसरात सोमवारी सकाळी ६.२९ वाजता जमिनीतून गूढ आवाज होऊन भूकंपाचा धक्का बसला आहे. या धक्क्याने घरावरील पत्रे चांगलेच थरथरत होते. या धक्क्याची २.८ रिस्टर स्केल इतकी तीव्रता नोंद झाली आहे. हा सौम्य स्वरूपाचा धक्का होता. विशेष म्हणजे सकाळच्या







## जिल्हा परिषद शाळा व गोगांव ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा परिषद शाळा आणि गोगांव ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती स्वच्छतेची शपथ घेऊन व गावामध्ये ठीक ठिकाणी स्वच्छ परिसर करून साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत मध्ये जेष्ठ. सदस्य प्रदीप जगताप यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या कार्यक्रमात महात्मा गांधी प्रतिमा. पूजन पंडित मुळजे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे , शरणप्पा कलशेट्टी, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड उपस्थित होते जिल्हा परिषद शाळेत आयोजित केलेल्या कार्यक्रमात महात्मा गांधी प्रतिमा पूजन अनिल मुलगे यांनी केले लाल बहादूर शास्त्री प्रतिमा पूजन शरणप्पा कलशेट्टी व गोगांव उपकेंद्र वैद्यकीय अधिकारी लींगराज नडगेरी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आकाश गायकवाड,उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, सदस्य विनोद बनसोडे, प्रमुख उपस्थितीत होते यावेळी महात्मा गांधी जीवन कार्याबद्दल शालेय मुला मुलींनी भाषणे केले. यावेळी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप व उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना कपडे वाटप व खाऊ वाटप करण्यात आले.कार्यक्रमास आरोग्य सेवक संजय सोनटक्के, अंगणवाडी तेजाबाई गुरव , भाग्यश्री सोनकवडे, आशा सेविका मधुमती गायकवाड, महादेव चव्हाण, ज्योती आलूरे, शांतकुमार बनसोडे, सुरेश सोनकांबळे, दत्ता आलूरे, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



### * सुविचार *

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### जीवनात पर्यटनाचे महत्त्व..

महात्मा गौतम बुद्ध, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, राजाराम मोहन रॉय, राहुल सांकृत्यायन, आचार्य विनोबा भावे, जयप्रकाश नारायण यांनी केलेल्या पर्यटनाचा भारतावर चांगला परिणाम झाला. एक गोष्ट सुरुवातीलाच समजून घ्यायला हवी की या सर्व महान व्यक्तींनी पर्यटक म्हणून देश-विदेशात भटकंती केली नाही, तर त्यामागची कारणे वेगळी होती, पण त्यांच्या या भेटींमुळे परिवर्तन घडून आले, हे मात्र आवर्जून दखल घेण्यासारखे आहे. तथागत गौतम बुद्धांचा प्रवास राजमहालातून गाव-खेडी- झोपड्यांपर्यंत झाला. त्यांच्या प्रवासाचे प्रयोजन स्पष्ट होते. लोकांच्या मनातून धर्माचे भय दूर करून त्यांना दुःख मुक्तीचा मार्ग सांगणे हा त्यांचा ध्यास होता. त्यांनी ज्ञानाचा दीप सर्वत्र लावत मार्गक्रमण केले. बुद्धाच्या विचारांनी आणि उपदेशांनी भारावले जाऊन मौर्य सम्राट अशोकानेदेखील आपल्या जीवनाचा मोठा काळ प्रवासात घालवला. परिणामी सर्वसामान्य जनतेशी त्याचा थेट संपर्क आला आणि प्रशासनाला मानवी चेहरा देण्यात त्याला यश आले. स्वामी विवेकानंदांनी वाराणसी शहरातून आपल्या प्रवासाचा आरंभ केला. उत्तर भारतातील बहुतेक शहरांना त्यांनी भेटी दिल्यात. त्याचप्रमाणे केवळ उत्तर भारतच नव्हे, तर राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र आणि मग दक्षिण भारताला त्यांनी भेटी दिल्या. देशांतर्गत प्रवास करून झाल्यावर १८९३ मध्ये ते विदेशात गेले. त्यांच्या या विदेश भेटीने प्रथमच भारताची निराळी प्रतिमा परदेशात तयार झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेले होते. नंतर वकिली करण्यासाठी दक्षिण आफ्रिकेत गेले. इथे त्यांना आलेल्या विविध अनुभवांचा त्यांच्या जीवनावर मोठा परिणाम झाला. भारतात परतल्यावर त्यांनी १९१९ मध्ये संपूर्ण देशाची भ्रमंती करायला सुरुवात केली. गावो-गावी ते फिरले. लोकांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. फलस्वरूप त्यांना देशाची परिस्थिती लक्षात आली. वरील सर्व महनीय व्यक्तींच्या जीवनात पर्यटन किती आणि कसे महत्त्वाचे ठरले हे दिसून येते. सध्याच्या काळात तर पर्यटनाच्या मुबलक संधी सर्वांना उपलब्ध होत आहेत. पर्यटन केवळ मौज, मस्ती आणि आनंद घेण्यासाठी नाही, तर अनेकविध कारणांसाठी करता येते. यातून खूप शिकता येते. अनुभव मिळतो. विचारांच्या कक्षा विस्तारतात. देश आणि विदेशातले लोकजीवन, चाली-रीती, प्रथा, परंपरा समजतात. व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनात पर्यटनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## महार लष्कराच्या शौर्याची शुर कर्तव्यदक्ष सैनिकांना नतमस्तक होऊ या

महार लष्कराच्या शौर्याची परंपरा दीर्घ काळापासून चालत आलेली आहे. पहिले महायुद्ध, असो आथवा दुसऱ्या महायुद्ध. जानेवारी १८१८ रोजी पुणे जिल्हा जिल्ह्यातील शिरुर तालुक्यातील कोरेगाव भीमा येथे दुसरा बाजीराव पेशवा आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यातील लढाईत महार सैनिकांनी मोठे शौर्य दाखविले. या लढाईत अवघ्या ५०० महार सैनिकांनी पेशव्यांच्या २८ हजार सैनिकांना पराभूत केल्याचा इतिहास आहे. इंग्रजांनी त्याची दखल घेऊन कोरेगाव भीमा येथे विजय स्मारक स्तंभ उभारला आहे. त्यावर या वीर महार सैनिकांची नावे कोरलेली आहे .यामध्ये १८८०च्या काळात अफगाणिस्तानमधील युद्धात चमकदार कामगिरी करणारे सुभेदार भातनकर त्यांना ब्रिटिशांनी नंतर पनवेलची जहागिरी दिली. जमादार गंगाराम सवादकर यांच्या बटालियनला पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला तुर्कस्तानात पाठविण्यात आले. त्यांच्या बटालियनने युद्धात चांगली कामगिरी केली. जमादार सवादकर यांचे ५ मार्च १९१८ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृत्यर्थ त्यांचे स्मारक तुर्कस्तानातच बांधण्यात आले.

इराकच्या राजांनी १९४५मध्ये तेथील डाकूंच्या त्रासापासून वाचण्यासाठी उपाययोजना करण्याची ब्रिटिशांना विनंती केली होती. महार रेजिमेंटच्या सेकंड बटालियनला त्यासाठी पाठविण्यात आले आणि त्यांनी कामगिरी फत्ते केली. या सैनिकांचा तेथील राजपुत्रांकडून विशेष सन्मान करण्यात आला होता. १९४७च्या युद्धातील राऊ कांबळे यांची वीरश्रीने भरलेली शौर्यगाथा ऐकली, तर अंगावर रोमांच उभे राहतात. या युद्धामध्ये राऊ कांबळे मशीनगन चालवत असताना त्यांच्या खंदकातील इतर लोक जखमी, हुतात्मा झाले. त्यांच्यासमोरच्या आपल्याच सैनिकांना पुढे जाण्याचा मार्ग रोखण्यात आला. अशा बिकट प्रसंगी त्यांनी स्वतः मशीनगन सुरू केली आणि शत्रूचा अचूक वेध टिपणारे फायरिंग केले. त्यांच्या मशीनगनने १५० शत्रूंचा वेध घेतला. या लढाईत ते हुतात्मा झाले. मध्य प्रदेशातील रेजिमेंटच्या मुख्यालयात राऊ कांबळे यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राऊ कांबळे यांच्या कुटुंबीयांना सांत्वनपर पत्र पाठवले.



त्याची प्रतही या पुन्याच्या सग्रांलयात उपलब्ध आहे.

हवालदार गोविंद कांबळे यांना आधुनिक बाजी प्रभू म्हणून संबोधले जाते. १९६२च्या युद्धात चीनबरोबर लढताना भारताला माघारी घ्यावी लागली होती. अशा वेळी हवालदार कांबळे यांनी एका बटालियनला वाचविण्यासाठी एक खिंड लढवली. बटालियन सुरक्षित स्थळी जाईपर्यंत त्यांनी शत्रूला थोपवून धरले. त्यांना वीरगती प्राप्त झाली. त्यासाठी हवालदार गोविंद कांबळे यांस 'वीरचक्र' मिळाले.

भारतीय सैनिकांनी विदेशामध्ये मोलाची कामगिरी केली.या रेजिमेंटचे सर्वोच्च पदावर दोघे जण गेले आहेत. त्यात जनरल के. व्ही. कृष्णराव, जनरल सुंदरजी यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे श्रीलंकेतील युद्धामध्ये मोलाची कामगिरी करणारे या रेजिमेंटचे मेजर परमेश्वरन यांना 'परमवीर चक्र'ने सन्मानित करण्यात आले आहे. पहिल्या महायुद्धात महार सैनिकांनी श्रमसैनिक म्हनून त्याच्याकडून विविध प्रकारची कामे करून घेतली. दुसऱ्या महायुद्धात मात्र पठाणी टोळ्यांच्या व इतरांच्या आक्रमणापासून हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीचे संरक्षणकार्य यांनी पार पाडले तसेच इराकमध्ये अरब लुटारूंचा बीमोड केला, तर भारताच्या फाळणीपूर्वी सव्वालक्ष मुसलमानांना होऊ घातलेल्या पाकिस्तानकडे सुखरूप पोहोचविण्याचे काम त्यांनीच केले. क्वेट्टा शहरामध्ये मुसलमान दंगलखोरांना वठणीवरआणले व बलुचिस्तानातील हिंदु, शीख आणि इतर लोकाना भारतात यांनीचसुखरूप आणून सोडले. हे काम त्यांनी मानवता व निःपक्षपातीपणाने केल्याबद्दल उच्च सैनिक अधिकाऱ्यांनी व पुढाऱ्यांनी महार रेजिमेंटची प्रशंसा केली होती.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४७-४८ काळात पाकिस्तानने भारताविरुद्ध केलेल्या युद्धात जांगारे येथील भीषण लढाईत (२४ डिसेंबर १९४७) शेकडो पाकिस्तानी सैनिकांना व पठाणी घुसखोरांना कंठस्नान घालताना एक महार लढाऊ तुकडी गारद झाली. या तुकडीचे नेते हवालदार रावू कांबळे व नाईक बारकू कांबळे होते. नौशहर, उरी, चकोथी, टिटवाल, दरास, कार्गिल येथील लढायांत महार पलटणींनी लक्षणीय वीरकार्य केले. तर १९५३ मध्ये कोरिया युद्धसमाप्तीनंतर युद्धवंद्यांच्या अदलाबदलीचे अवघड व नाजूक कार्य पार पाडण्यात जनरल थोरातांना तिसऱ्या महार पलटणीचे साहाय्य मिळाले होते.

जून १९६० मध्ये बेल्जियन काँगो ह काँगो प्रजासत्ताक व झाइर स्वतंत्र झाल्याबरोबरच तेथे यादवी युद्ध सुरू झाले. संयुक्त राष्ट्रसंघटनेने युद्ध थांबविण्यासाठी 'संयुक्त राष्ट्रसंघटना सेना' निर्माण केली. त्या सेनेत महार रेजिमेंटची एक कंपनी होती. काँगोच्या कटांगा प्रांतातील लढाईमध्ये निर्भयतेने व निःपक्षपातीपणे काम केल्याबद्दल कंपनीच्या एका अधिकाऱ्याला वीरचक्र हे सैनिकी पदक देण्यात आले.

गोवा मुक्तिसंग्रामामध्ये (१९६१) याच छत्रीधारी कंपनीने भाग घेतला होता तर १९६२ साली चिनी आक्रमणाला (ऑक्टोबर-नोव्हेंबर) तोंड देण्यासाठी महार पलटणींनीच चुशूल, दौलतबेगोल्डी (लडाख व अक्साई चीन) आणि कामेंग विभाग (ईशान्य भारत) या ठिकाणी शौर्य गाजविले होते. १९६५ च्या चिनी आक्रमणाच्या वेळीही कच्छ रणातील सरदारचौकी व व्हिगोकोट येथील लढायांत महार जवानांनी तलवार गाजविली. त्याप्रसंगी हवालदार भिंगारदिवे यास वीरचक्र मिळाले. सप्टेंबर १९६५ मध्येही काश्मीरातील संबा, जोरियान, खेमकरण, अस्सल उत्तर इ. लढायांत महार पलटनींनी शौर्य प्रकट केले होते. खेमकरणच्या लढाईत महार पलटणींनी भयंकर नुकसान सोसले.तसेच १९७१ सालच्या पाकिस्तानी आक्रमणातही ह भारत-पाकिस्तान संघर्ष महार पलटणी बांगला देश, पंजाब व काश्मीर येथील युद्धांत होत्या तर हरहरकलान, पर्वतअली, कैयान, शेजरा, ठाणपीर आणि बांगला देशात शमशेरनगर, मौलवी बाझार, सिल्हेट,बेलोनिया व चितगाग इ. ठिकाणच्या युद्धप्रसंगी त्यांच्या पराक्रमाची वाहवा झाली होती.

निरनिराळ्या युद्धांत असामान्य पराक्रम केल्याबद्दल नाईक कृष्णा सोनावणे, कर्नल गुरुबक्षसिंग, नाईक अनसूयाप्रसाद (मरणोत्तर) यांना महावीर चक्र, बावीस जवान व अधिकाऱ्यांना वीरचक्र आणि मेजर जनरल व्यंकट कृष्णराव यांस परमविशिष्ट सेवापदक असे सैनिकी सन्मान मिळाले आहेत.

सैनिकी परंपरेप्रमाणे (१९४९ ते १९६१) रेजिमेंटचे पहिले कर्नल लेफ्टनंट-जनरल शंकरराव थोरात होते तर दुसरे कर्नल लेफ्टनंट जनरल कृष्णराव ह राव, जन. के. व्ही. कृष्ण हे होते.

रेजिमेंटच्या स्थापनेपासून 'वीर शिवाजी के बालक हम' या चरणाने रेजिमेंटचे घोषगीत गायिले-वाजविले जाई तथापि पुढे डिसेंबर १९६३ मध्ये 'वीर शिवाजी' या शब्दाऐवजी 'वीर भारत' असा बदल करण्यात आला. तसेच स्वतंत्र भारताच्या निर्मितीनंतर रेजिमेंटच्या बॅजमध्ये असलेला 'कोरेगाव' हा शब्द आणि 'कोरेगाव विजयस्तंभ' ही प्रतिमा प्रदर्शित करण्याचे बंद करण्यात येऊन त्या जागी 'यश-सिद्धी' हा कार्यवाचक शब्द व 'खंजीर' हे शौर्यदर्शक प्रतीक घालण्यात आले.

महार रेजिमेंटच्या सैनिकांनी युध्दकाळात आणि शांतीकाळात आपल्या कर्तव्यदक्षतेमुळे जगभरात कीर्ती मिळविली आहे. महार रेजिमेंटने ९ युध्दक्षेत्र सन्मान आणि १२ रणक्षेत्र सन्मान मिळविले आहेत. तसेच १ परमवीर चक्र, १ अशोक चक्र, ९ परम विशिष्ट सेना पदक, ४ महावीरचक्र, ४ कीर्तीचक्र, १ पद्मश्री, ३ उत्तम युध्द सेवा पदक, १६ अतिविशिष्ट सेवा पदक, ३० वीरचक्र, ३९ शौर्यचक्र पदक, २२० सेना मेडल आणि बरेच इतर पुरस्कार मिळविलेले आहेत. याशिवाय महार रेजिमेंटने २ चिफ ऑफ आर्मी स्टाफ तसेच २ आर्मी कमांडर भारतीय सेनेला देण्याचा मान मिळविला आहे.

अशा या शुर सैनिकांची इंग्रज सरकारने उच्चवर्णीयांच्या दबावा पोटी १९२२ ते दुसरे महायुद्ध या काळात महार सैनिकांची भरती बंद होती.परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज सरकारवर पत्रव्यवहार करून दबाव आणून परत १ ऑक्टोबर१९४२ला,महार रेजिमेंट ला परत गतवैभव प्राप्त करून दिले.

आज ही देशसेवा करून आलेले सैनिक बाबासाहेबांच्या समता सैनिक दलात मोठ्या प्रमाणात भाग घेउन आपल्या वरील ऊपकाराची परतफेड करून चळवळीला मोठ हातभार लावत आहे. समता सैनिक दल ऊभारनीत रिटयर महार सैनिकच आघाडीवर होते,प्रथमतः यांमध्ये सेवानिवृत्त सैनिक,सुभेदार गंगाराम सवादकर. शंकर वडळकर, हवालदार धागावकर, अर्जुन जातेकर, लोटेकर, सिताराम हाटे, वीरकर, गोपाळ अचोलकर, कृष्णा तांबे इत्यादी सैनिक होते. त्यांच्यात सुभेदार सवादकर लढाऊ आणि तरबेज सैनिक होते.

.अश्या शुर कर्तव्यदक्ष सैनिकांना नतमस्तक होऊ या.

पान १ वरुन

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ..

अ.भा.श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सर्वाधिकारी तथा संमेलनाध्यक्ष लक्ष्मणजी गमे, प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ, श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थानचे अध्यक्ष डॉ.विजय पर्वत आदी उपस्थित होते.

विदर्भ ही संतांची मांदियाळी असलेली भूमी आहे. येथील तीन संतांनी फार मोठ्या प्रमाणावर प्रबोधनाचे काम केले. प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांनी आपल्या दिव्यदृष्टीतून मोठ्या प्रमाणावर प्रबोधनपर साहित्याची निर्मिती केली. संत गाडगेबाबांनी स्वच्छतेसोबतच जातीभेद, अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अखिल भारतात जागरुकता आणली. संपूर्ण विश्वात त्यांनी मानवतेचा विचार पोहोचविण्याचे काम केले. युवकांना त्यांनी संस्कार दिले. वाईट रुढी, परंपरा तोडल्या पाहिजे, गरिबांची, समाजाची सेवा हाच मोठा धर्म आहे, हे राष्ट्रसंतांनी समाजमनात रुजविले.

तुकडोजी महाराजांनी आपले साहित्य, भजनातून एक मोठी पिढी तयार केली. या पिढीने पुढे सशक्त समाज तयार करण्याते हातभार लावला. आम्ही पारतंत्र्यात रहायला तयार नाही, असे वातावरण त्यांनी आपल्या प्रबोधनातून तयार केले. त्यांनी स्वातंत्र्य संग्राम सेनानी म्हणून केलेले काम मोठे आहे. समाजाच्या समस्या व त्यावरील निराकरण त्यांच्या भजनात दिसून येते. भजनातून जनजागृतीसह चांगला विचार त्यांनी समाजाला दिला. राष्ट्रसंतांनी मराठी, हिंदीत १२०० भजने लिहली. ही भजने देशभरात प्रसिद्ध झालीत, असे पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले.

राष्ट्रपती भवनात देखील तुकडोजी महाराजांच्या भजनाचा कार्यक्रम झाला. राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद त्यांच्या भजनाने प्रभावित झाले होते.

त्यांनीच महाराजांना राष्ट्रसंत ही पदवी दिली. राष्ट्रपतींद्वारे राष्ट्रसंत ही पदवी दिलेले तुकडोजी महाराज एकमेव संत आहे. जपानच्या परिषदेत तुकडोजी महाराजांनी उपस्थितांना मोहित केले होते. राष्ट्रसंतांचा विचार शाश्वत आहे, वाहत्या नदीसारखा त्यांचा विचार आहे. समाजाला अपेक्षित, आवश्यक आहे, ते देण्याचे काम त्यांच्या विचारातून झाले.

महाराजांनी समाजाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे 'ग्रामगीता' होय. प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाणीव ग्रामगीता करुन देते. स्वयंपूर्ण गाव कसे तयार होईल, आपणच आपले शिल्पकार कसे होऊ शकू, हे ग्रामगीता सांगते. महाराजांचे विचार, साहित्य, भजने लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम या संमेलनातून होणार आहे.

श्रीसंत भोजाजी महाराज मंदिरात मोठ्या संख्येने भक्त येतात. मंदिरातील प्रसादाची पुरणपोळी समाधान देणारी आहे. आजनसरा परिसराच्या विकासाबाबत आश्वस्त करतो. विकासासाठी आराखडा मंजूर करून घेऊ. बांधकाम व सर्व कामांचा पाठपुरावा करू. येथे करण्यात आलेल्या विविध मागण्या पुर्ण करण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून मी काम करेल, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

आजनसरा परिसरात २५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. सन २००० मध्ये भुमिपूजन झालेल्या आजनसरा बॅरेजचे दोन महिन्यात टेंडर काढू. पाईप डिस्ट्रिब्यूशन नेटवर्क पद्धतीने क्षेत्र लवकरच ओलिताखाली येणार असल्याचे ते म्हणाले. जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे पिवळा मोझॅकमुळे नुकसान झाले आहे. या नुकसानीची माहिती विमा कंपन्यांना देऊन तत्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी दिले. गेल्यावर्षी शेतकऱ्यांना ११ हजार कोटी रुपयांची नुकसान भरपाई दिली. यावर्षी देखील नुकसानग्रस्तांना मदतीची भूमिका आहे. मोझरी आश्रम परिसरात राहिलेली कामे पुर्ण करु, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी खा.रामदास तडस यांनी सोयाबीन पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देणे आवश्यक असल्याचे सांगितले. श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थानला 'अ' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा मिळणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. आ.समीर कुणावार यांनी महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आजनसरा येथे प्रत्येक महिन्याला १२ ते १५ लाख भाविक येतात. या स्थळाच्या विकासासाठी विकास आराखडा केला जावा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य घराघरात, मनामनात पोहोचले पाहिजे, असे सांगितले.

सुरुवातीस दिपप्रज्वलन करून उपमुख्यमंत्र्यांच्याहस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. यावेळी गुरुवर्य महंत सुरेश शरणजी शास्त्री महाराज, प्रकाश महाराज वाघ, श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थानचे अध्यक्ष डॉ.विजय पर्वत यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचलन सचिन घोडे यांनी केले तर आभार अ.भा.श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोथे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमास भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर विविध परिसंवाद घेण्यात आले.

श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थानच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ई-भूमिपूजन झाले. त्यात स्पर्धा परिक्षा अकादमी, मुक्तांगण बाग, कामधेनू गो-शाळा व ग्रामगीता भवनचा समावेश आहे.

आजनसरा येथे आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रीसंत भोजाजी महाराज देवस्थानला भेट दिली. यावेळी त्यांनी भोजाजी महाराजांच्या मुर्तीचे दर्शन घेतले व आरती केली.

### पुरीतील जगन्नाथ मंदिराची श्रीमंती

नावावर एकूण ६०,४२६.९४३ एकर जमीन आहे.

यापैकी श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाला ३८,०६१,८९२ एकर जमिनीचा ताबा अंतिम रेकॉर्ड मिळाला झाला आहे, असं त्यांनी सांगितलं. ओडिशाप्रमाणे, इतर सहा राज्यांमध्ये ३९५.२५२ एकर जमीन भगवान जगन्नाथ यांच्या नावावर आहे, अशी माहिती सरका यांनी दिली आहे.बेकायदेशीर अतिक्रमणे काढण्यासाठी मंदिराने राज्यातील विविध तालुक्यांमध्ये यापूर्वी ९७४ अतिक्रमण प्रकरणे दाखल केली असल्याची माहिती जगन्नाथ सरका यांनी दिली आहे. डाढ- अधिकाऱ्यांनी योग्य तपास केल्यानंतर, श्री जगन्नाथ मंदिर अधिनियम, १९५५ च्या तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशा माहितीही मंत्र्यांनी दिली आहे.

जगन्नाथ मंदिर हे चार धाम पैकी एक आहे. ओडिशातील पुरी येथे जगन्नाथ मंदिरात बलराम आणि बहीण सुभद्रा यांच्यासह भगवान श्रीकृष्णाची पूजा केली जाते. जिथे भगवान आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षात जगन्नाथ मंदिरात भव्य रथयात्रा काढली जाते. देवशयनी एकादशीला ही रथयात्रा संपते. अनादी काळापासून हा सण श्रद्धेने आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. हिंदू पुराणांनुसार, हरि म्हणजे विष्णू आणि हर किंवा शिव हे शाश्वत मित्र आहेत, असं म्हटलं आहे. त्यामुळे जेथे भगवान विष्णूंचा वास आहे, तिथे भगवान शिव देखील असतात, असं मानलं जातं. त्यामुळे प्रभू जगन्नाथवर भक्तांची खूप श्रद्धा आहे.

### राष्ट्रपिता महात्मा गांधींना पंतप्रधान

आज संपूर्ण देशभरात गांधी जयंती साजरी केली जात आहे. दिल्लीतील राजघाटावर आज एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं आहे. बापूंना श्रद्धांजली वाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक दिग्गज नेते राजघाटावर पोहोचणार आहेत. गांधी जयंतीच्या निमित्ताने देशभरात स्वच्छता मोहीमही राबवली जात आहे.

बापूंनी नेहमीच सत्य आणि अहिंसेची शिकवण दिली. गांधीजींचे विचार फक्त भारतासाठी नाही तर, जगासाठी मार्गदर्शक आहेत. दरवर्षी २ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजता केला जातो. संयुक्त राष्ट्राने १५ जून २००७ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सन्मानार्थ आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाची घोषणा केली होती. तेव्हापासून हा दिवस जगभरात साजरा केला जातो.

पंतप्रधान मोदी यांनी लाल बहादूर शास्त्रींजींना आदरांजली अर्पण केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत लिहीलं की, 'लाल बहादूर शास्त्रीजींचं त्यांच्या जयंतीनिमित्त स्मरण. त्यांचा साधेपणा, राष्ट्रप्रती समर्पण आणि 'जय जवान, जय किसान' हा नारा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते. भारताच्या प्रगतीसाठी त्यांची बांधिलकी आणि आव्हानात्मक काळात त्यांचे नेतृत्व अनुकरणीय आहे. सशक्त भारताचे त्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सतत कार्य करू या.'



### आयुष्मान भव या अभियानांतर्गत अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने विविध रोगांची तपासणी उपचार

अक्कलकोट/प्रतिनिधीः व्याधीमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने आयुष्मान भव या अभियानांतर्गत अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने विविध रोगांची तपासणी उपचार व शस्त्रक्रिया करून आयुष्मान भारत आरोग्य कार्ड ची नोंदणी वितरित करून आरोग्य संपदा करीत असल्याचे गौरवउद्गार सामाजिक कार्यकर्ते अरविंद पाटील यांनी केले. ते अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे आयुष्मान भव आरोग्य सेवा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी समाजसेवक पाटील बोलत होते.

याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी अधीक्षक डॉ. अशोक राठोड, डॉ रवींद्र बनसोडे, डॉ. निखिल क्षीरसागर, श्रीमती शबाना तारानाईक, डॉ. सतीश बिराजदार, डॉ. सुलतानपुर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी गरोदर माता तपासणी १८ वर्षाच्या आतील मुलांची तपासणी वयोवृद्धांचे रक्तदाब व मधुमेह ईसीजी मोतीबिंदूची तपासणी करण्यात आले यामध्ये २५ मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांना पुणे येथे शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले या दिनी दिवसभर ३६२ रुग्णांची तपासणी करून उपचार करण्यात आली. प्रसंगी आयुष्मान भव आरोग्यसेवा कार्ड ही काहींना वितरित करून उपस्थितांना अवयव दान व रक्तदानाचे महत्त्व पटवून देऊन दान करण्याचे आव्हान ही करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष बसवराज अळोळी, सपोनी सत्तार शेख, डॉ. सुलतानपुरे डॉ. सतीश बिराजदार, श्रीमती सुरेखा वर्दे, प्रमिला वाघमारे, मनीषा वर्दे, मंजुश्री मुळे, उज्वला फडतरे, धनश्री सोनवणे, अंजली राठोड, आदी कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# राज्य महामंडळच्या बसेसची भयाण दुरावस्था

राज्य परिवहन महामंडला कुणी वाली शिल्लक राहिलाय का?



भिवंडी/विजय घनघाव : ठाणे जिल्ह्यातील भिवंडी बस स्थानकामधून बस क्रमांक चक-१४ इढ ४९२१ भिवंडी - कल्याण - नगर या बस चं अतिशय विदारक दृश्य पहायला मिळालं. या बस मधील सीट हे चक्क तुटलेल्या, मोडलेल्या अवस्थेत होते.. कुठे सीट कव्हर फाटलेले दिसत होते. खरोखर प्रवाशांच्या जीवाशी जणू खेळ चाललाय असंच चित्र नजरेस पडत होते.. बसच्या या अवस्थेबद्दल बस कंडक्टर ला विचारलं असता.आम्ही ठरलो नोकर वर्ग.. आम्ही काय करणार.. असं उत्तर ऐकायला भेटलं. दोन दिवसापूर्वी एका बस प्रवाशी मित्राने या बस मधून प्रवास करीत असता सदर माहिती दिली आहे. खरोखर राज्य परिवहन महामंडळ, प्रशासन याबाबत काही खबरदारी घेईल की हे असंच चालत राहणार असा गहन प्रश्न बस प्रवाशांना पडल्याशिवाय राहणार नाही. यातून राज्य परिवहन महामंडळाला कुणी वाली शिल्लक राहिलाय का असा प्रश्न आपसूक येईल यात शंका नाही..

# एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाची धडाकेबाज कारवाई

सोलापूर/प्रतिनिधीः एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतून दोन परदेशी बनावटीचे पिस्टल व पाच जिवंत काडतुसे विक्री करण्यास आलेल्या इसमास जेरबंद करुन त्याच्याकडुन ०२ लाख १० हजार ५०० रुपयाचा मुद्येमाल हस्तगत....

सोलापूर शहर येथे बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्या इसमांची माहिती काढुन त्यांचेवर कारवाई करणेकामी मा.पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र माने व मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ श्री. विजय कबाडे यांनी सुचना दिल्या होत्या.त्याअनुषंगाने एमआयडीसी पोलीस ठाणे, सोलापूर शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजन माने यांनी गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलीस उप-निरीक्षक श्री. विक्रम रजपूत यांना आदेशीत केले होते.त्यानुसार पोलीस उप-निरीक्षक विक्रम रजपूत व त्यांचे पथक हे अवैध शस्त्र बाळगणारे व विक्री करणाऱ्या

संशयीतांच्या पाळतीवर होते. पथकातील पोहेकॉ/ १२७ राकेश पाटील यांना त्यांचे





गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, एक इसम परदेशी बनावटीचे पिस्टल विक्री करण्याकरीता सुनिल नगर,एमआयडीसी, पाण्याच्या टाकीजवळ येथे येणार आहे. त्यानुसार त्यांनी सदरची माहिती पोलीस उप निरीक्षक विक्रम रजपूत यांना दिली. त्यानंतर मिळालेल्या बातमीनुसार दि.०१.१०.२०२३ रोजी मध्यरात्री ०१.०० वा. चे सुमारास पोलीस उप-निरीक्षक रजपूत व त्यांचे पथक सुनिल नगर पाण्याच्या टाकीजवळ सापळा लावुन

थांबले असता तिथे काही वेळाने एक इसम हातात पिशवी घेऊन चालत येत असल्याचे दिसले. सदरचा इसम दिसताच बातमीदाराने इशारा केला त्यावेळी पोकॉ/ १५८७ याळगी यांनी त्यास थांबण्यास सांगीतले असता तो संशयीत इसम पळून जाण्याचा प्रयत्न करु लागला, तेंव्हा डी.बी. पथकातील इतर अंमलदारांनी त्यास झडप घालुन जागीच पकडले व त्याच्या कमरेला लावलेले आणि कापडी पिशवीतील असे दोन परदेशी बनावटीचे पिस्टल व पाच जिवंत काडतुसे असा एकुण ०२ लाख १० हजार ५०० रुपयाचा मुद्येमाल हस्तगत करुन आरोपी नामे सुनिल लक्ष्मीकांत अकोले, वय-३०, रा. ४३, न्यु सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर यास अटक केली आहे. सदरील आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्याच्यावर एमआयडीसी, जेलरोड, जोडभावी पेठ पोलीस स्टेशनमध्ये जबरी चोरी, जबरी चोरी करत असताना दुखापत करणे तसेच घरफोडी सारखे विविध गुन्हे दाखल आहेत.सदरची कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने,पोलीस उप-आयुक्त परिमंडळ विजय कबाडे, सहा.पोलीस आयुक्त संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजन माने, पो.नि. शिवशंकर बोंदर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक विक्रम रजपुत, पोहेकॉ राकेश पाटील, नाना उबाळे, दिपक डोके, सचिन भांगे, पोना. मंगेश गायकवाड, पोकॉ. सुहास अर्जुन, शंकर याळगी, काशीनाथ

वाघे, दिपक नारायणकर, शैलेश स्वामी, अमोल यादव, अमर शिवसिंगवाले, आमसिध्द निंबाळ, देवीदास कदम, भारतसिंग तुक्कुवाले यांनी पार पाडली.

# नळदुर्ग येथे पोषण आहार पंधरवडाचा समारोप



वागदरी/एस.के.गायकवाड : राष्ट्रीय पोषण आहार महीना आभियान अंतर्गत नळदुर्ग ता.तुळजापूर येथे शहरातील १ ते ९ अंगणवाडीत पोषण आहार पंधरवाडा हा उपक्रम राबविण्यात आला असून येथील भिमनगर बौद्ध विहारात १ ते ९ अंगणवाडी एकत्र येवून या पोषण पंधरवाडा आभियानाचा समारोप केला. सही पोषण देश रोषण,सुपोषित भारत साक्षर भारत,सशक्त भारत राष्ट्रीय पोषण महिना आभियान अंतर्गत एकात्मिक बालविकास प्रकल्प (ICDS) आधिकारी श्री कड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग शहरातील एकूण नऊ अंगणवाडी मध्ये पोषण आहार पंधरवडा साजरा करण्यात आला. या पोषण पंधरवड्याचा समारोप येथील भिमनगर बौद्ध विहारात अंगवाडी क्रमांक १ ते ९ अंगणवाड्यानी एकत्रितपणे केला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्री कड साहेब होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर,सम्राट ग्रुपचे संस्थापक सुर्यकांत (पप्पू ) सुरवसे आदी होते.याप्रसंगी श्री कड साहेब व अंगणवाडी मुख्य सेविका श्रीमती मगर मॅंडम यांनी बेटी बचाव बेटी पढाव,एक मुल एक झाड,पर्यावरण, स्वच्छता आदी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.यानिमित्ताने फॅन्शी ड्रेस स्पर्धेचे ही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका ज्योती घोडके,सुनिता इंगोले,किरण शिंदे,संगीता राठोड,बाडेवाले आस्मा,जाधव सुनिता, गायकवाड रोहिणी,बनसोडे अशा, बावारते आस्मा आदीनी परिश्रम घेतले.यावेळी गरोदर माता, किशोरवयीन मुली,महिला, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार कोणीही संपवू शकत नाही : आ.प्रणिती शिंदे यांचे प्रतिपादन



सोलापूर/प्रतिनिधीः पंतप्रधान शोसाठी गांधीजींचा वापर करतात, इतर वेळेस मात्र गांधी विचारांचा त्यांना विसर पडतो.

सोलापुर शहर कॉंग्रेस पक्षाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त महात्मा गांधी यांच्या रेल्वे स्टेशन येथील पुतळयास आमदार प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच कॉंग्रेस भवन सोलापूर येथे भारताचे माजी पंतप्रधान स्वातंत्रसेनानी लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस आमदार प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते शहर अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच यावेळी कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी पक्षाच्या (शरद पवार गट ) वतीने एकत्र येऊन रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळा येथे झेंडा वंदन करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार प्रणितीताई शिंदे म्हणाले की, आज कॉंग्रेस पक्ष आणि अनेक संघटना, सर्वधर्माचे नागरिक एकत्र येऊन महात्मा गांधीजी, लाल बहादुर शास्त्री यांची जयंती साजरा करत आहेत. महात्मा गांधीजीनी सत्याग्रह आणि विविध प्रकारे क्रांतिकारी आंदोलने करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. आज देश कठीण प्रसंगातुन जात असताना या देशाला पुन्हा एकदा गांधी विचारांची देशाला गरज आहे. पंतप्रधान शोसाठी महात्मा गांधीजींचा वापर करतात इतर वेळेस मात्र त्यांच्या विचारांचा त्यांना विसर पडतो. या देशात महात्मा गांधीजींचे विचार कोणीही संपवू शकत नाही. महात्मा गांधीजीनी ज्या पक्षाला साथ दिली त्या पक्षाचे आपण आहोत याचा आम्हाला अभिमान आहे. येणारे दिवस आपल्यासाठी आव्हानाचे आहेत. लोकांची सेवा ही सर्वोकृष्ठ सेवा आहे. लोकांची सेवा करण्याचा आणि लोकशाही आणि संविधान मजबूत करण्यासाठी आपण दृढ संकल्प आज करू या असे आवाहन केले.

# १५० वर्षांनंतरही जगाला ‘बापूं’ची गरज
## प्रा.चंद्रकांत पोतदार यांचे प्रतिपादन



भुरीकवठे/प्रतिनिधीः तालुका अक्कलकोट येथील ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालय येथे आज गांधी जयंती निमित्त महात्मा गांधीजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून गांधी जयंती साजरी करण्यात आले.

यावेळी सचिव चंद्रकांत पोतदार मनोगत व्यक्त करताना म्हणाले २ ऑक्टोबर रोजी, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती आहे. यंदा बापूंची १५४ वी जयंती साजरी केली जात आहे. संपूर्ण देशात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गांधी जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. देशभरात स्वच्छता अभियानही राबवलं जात आहे. 'अहिंसा परमो धर्म:' आत्मसात करून बापूंनी आपल्या हयातीतच या विचाराची ताकद जगाला जाणवून दिली. अहिंसक सत्याग्रहाच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीत मोलाचं योगदान देऊन बापूंनी देशाला आणि जगाला अहिंसेचा विचार पटवून दिला. देशांतील अशांतता आणि युद्धाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांची खूप जास्त गरज आहे. साधी राहणी, उच्च विचार आणि सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालणारी त्यांची तत्वे आजही जगाला शांततेचा मार्ग दाखवत आहेत. तसेच २ ऑक्टोबर १९९१ हा संस्थेचा स्थापना दिवस आज संस्थेला ३२ वर्षे पूर्ण झाली म्हणून संस्थेचा वर्धापन दिन देखील साजरा करण्यात आला यावेळी अध्यक्ष अप्पासाहेब कलशेट्टी सचिव चंद्रकांत पोतदार संस्थेचे कर्मचारी वाचक सभासद व ग्रामस्थ उपस्थित होते.

# बोरेगावच्या सरपंच स्वामी यांचा भाजपमध्ये प्रवेश

बोरेगाव/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील बोरेगाव येथील सरपंच अनिता गौरीशंकर स्वामी यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या उपस्थितीत भारतीय जनता



पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी सरपंच स्वामी यांनी यापुढे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परिसरात भाजप वाढण्यासाठी कार्य करणार असून आगामी निवडणुकीत बोरेगावात भारतीय जनता पक्षाला जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे तसेच शासकीय निधीतून गावाचा विकास करणार असल्याचेही त्यांनी सांगितले याप्रसंगी बोलताना सचिन कल्याण शेट्टी यांनी गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणार असून निवडणूकीनंतर गट तट मतभेद बाजूला ठेवून भारतीय जनता पक्ष वाढीसाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे यावेळी उपसरपंच नवनाथ जडगे ग्रामपंचायत सदस्या गौराबाई बंडगर दर्शनाळचे सरपंच सुनील बिराजदार डोंबरजवळगे सरपंच चिदानंद माळगे हन्नूरचे उपसरपंच सागर कल्याण शेट्टी पितापूर सरपंच सगरी आदित्य बिराजदार केंचप्पा खांडेकर आडत व्यापारी हणमंत बणजगोळे नागनाथ खेलप्पा औरसंगे सिध्दाराम निंबाळ माजी उपसरपंच अशपाक हवालदार सिराज अष्टगी चंद्रकांत बणजगोळे शिवानंद बनसोडे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नील बणजगोळे यांनी केले तर गौरीशंकर स्वामी यांनी आभार मानले.

# उतम गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम



अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट प्रभाग क्रमांक सात मध्ये दिनांक १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत स्वच्छतागृह पासून ते स्वामी समर्थ अन्नछत्र मडळ परिसरात एक तारीख एक घंटा एक तास स्वच्छता हि सेवा या उपक्रमांतर्गत मा. नगर सेवक उतम गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आले

सदर कार्यक्रम वेळेस तुषार गायकवाड , सगार सुतार .संदिप गायकवाड, शेखर गायकवाड ,संदिप सोनकांबळे ,नागेश मडिखांबे, स्वप्निल गायकवाड, उमेश हिरोला, गणेश मडिखांबे रोहित वाघमारे ,इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रावंती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गुरु पूजन महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



सोलापूर/प्रतिनिधीः श्रावंती बहुउद्देशीय संस्था सोलापूर संचलित श्रावंती संगीत विद्यालयाच्या वतीने गुरुपूजन महोत्सव २०२३ उत्साहात साजरा करण्यात आला. नवी पेठ येथील शिवस्मारक सभागृहांमध्ये कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात श्रावंती संगीत विद्यालयाच्या कुमठा नाका शाखा व शेळगी शाखा या दोन्ही शाखेमधील विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुचरणी अर्पण केले. या कार्यक्रमात सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने आपल्या गुरुचे ऋतुराज सोनवणे , पुनम सोनवणे , सुनिता सोनवणे यांचे उपाध्य पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संगीत विद्या शारद प्रमुख प्रवीण कुंभार ,महेश पाटकुलकर , डॉ प्रिती सोनवणे,सुदर्शन राऊत, अमोल निकम हे होते. अतिथी कलाकार म्हणून कुमारी ब्रानपुरकर यांनी आपले नृत्य कला सादर केली.

# श्री शहाजी हायस्कूलमध्ये सायकल बँक या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ

अक्कलकोट/प्रतिनीधी : समर्थ प्रतिष्ठान व माजी विद्यार्थी यांच्यातर्फे मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलमध्ये सायकल बँक या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या सायकल बँकेत पाच सायकली पहिल्यांदा देण्यात आलेल्या आहेत.

अक्कलकोट तालुक्यात प्रथमच सायकल बँक उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आले असून या उपक्रमाअंतर्गत श्री शहाजी हायस्कूल या प्रशालेस ५ सायकली उपलब्ध करून देण्यात आले. शाळेपासून दूर अंतरावर राहणारे गोरगरीब गरजु मुले शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात रहावे हे या उपक्रमाचे मुख्य उद्देश असून प्रतिवर्षी हे उपक्रम राबविले जाणार आहे. या उपक्रमाची जबाबदारी शाळेच्या मुख्याध्यापक यांची असून प्रतिवर्षी परीक्षा झाल्यानंतर लाभार्थी विध्यार्थी यांनी सायकल शाळेत परत जमा करावयाचे आहे. पुढील वर्षी पुन्हा गरजू विद्यार्थ्यांना ही सायकल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष व प्रशालेचे माजी विद्यार्थी महेश हिंडोळे यांच्या वाढदिवसानिमित्त सायकल बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. यावर्षी पाच सायकली देण्यात आलेल्या असून कालांतराने सायकलची संख्या वाढविणार असल्याचे समर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश हिंडोळे यांनी सांगितले.

या कार्यक्रमास मिलन कल्याणशेट्टी,मल्लिनाथ साखरे, मल्लिनाथ स्वामी,प्रभाकर मजगे,लक्ष्मीकांत धनशेट्टी,नागराज कुंभार, फैजअहमद (नन्नु) कोरबू,चंद्रकांत मसुती इंजिनिअर,दयानंद बिडवे,संतोष घिवारे,जगदीश बोलदे,रवी वाघमोडे,प्रदीप हिंडोळे प्रशालेचे मुख्याध्यापक सुदेश कांबळे,उपमुख्याध्यापक शिवाजी





भांगरे, पर्यवेक्षक राजेश पडवळकर आदीसह अमोल कोकाटे,विकास राऊत, चेतन जाधव,विजय बुद्रुक,ज्योती बगले,नसरीन तांबोळी,सुवर्णा गायकवाड,मंजुषा साळुंखे,अर्चना गायकवाड आदीसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद शिंदे यांनी तर आभार विकास राऊत यांनी मानले.

# पत्रकार हल्ल्यासंबंधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन सकारात्मक : ना.पाटील

पुणे/प्रतिनिधी : पत्रकार हल्ल्यासंबंधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन सकारात्मक असून त्याबाबत पोलीस अधिकाऱ्यांनाही या कायद्याबाबत माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे सुरु असलेल्या राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीस पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सदिच्छा भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, डॉ. राहुल तिडके, किशोर गांगुर्डे, विभागीय उपसंचालक व समितीचे सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले, पत्रकार समाजाचे प्रतिनिधित्व करताना राजकीय शक्तीवर अंकुश ठेवण्याचे काम करतात. समाजाला दिशा दाखविण्याचे आणि समाजाचे प्रश्न मांडण्याचे महत्वाचे काम माध्यमाद्वारे होते. पत्रकारांना आरोग्य सुविधा व घरे देण्यासाठीही शासन प्रयत्नशील आहे.यावेळी राज्य समितीचे अध्यक्ष यदु जोशी यांनी राज्य अधिस्वीकृती समितीची रचना, व कामकाजाबाबत माहिती दिली.

राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते उद्घाटन तत्पूर्वी पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे आयोजित राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीचे उद्घाटन माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

माजी राज्यमंत्री श्री.पाटील म्हणाले, राज्यात तालुकास्तरावरील पत्रकारांची संख्या वाढते आहे. तालुकास्तरावरील पत्रकारांसाठी पत्रकार भवन असणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन समितीचे पत्रकार भवन बांधण्यासाठी सहकार्य घेता येईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

ते म्हणाले, माहिती व जनसंपर्क महाराष्ट्राचा कणा आहे. सांस्कृतिक विभाग व माहिती व जनसंपर्क विभाग महाराष्ट्राचे भूषण आहे. पत्रकारांवर खूप महत्त्वाची जबाबदारी आहे. समितीने बदलत्या परिस्थितीचा अभ्यास करावा.

पत्रकारांसाठी विभागीय चर्चासत्रे आयोजित करावीत, असे सांगितले. राज्य समितीचे अध्यक्ष श्री. जोशी म्हणाले, समितीमध्ये सर्व प्रसिद्धी माध्यमांमध्ये काम करणारे पत्रकार आहेत. माध्यम क्षेत्राच्या विकासासाठी व अशा अभ्यासक्रमासाठी समिती सदस्य सहकार्य करतील, असेही ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री श्री.पाटील, पुणे विभागाचे उपसंचालक डॉ.पुरुषोत्तम पाटोदकर आणि पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरिष पाटणे यांनी बैठकीस उपस्थित सर्व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बैठकीस नवी मुंबई, पुणे, नाशिक, लातूर, अमरावती, नागपूर, कोल्हापूर विभागाचे उपसंचालक व समितीचे सदस्य उपस्थित होते.

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची राज्य अधिस्वीकृती समितीच्या बैठकीस सदिच्छा भेट






## राजधानीत राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी

नवी दिल्ली : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी प्रधानमंत्री भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांची जयंती आज महाराष्ट्र सदन येथे साजरी करण्यात आली. कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदनात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा प्रधान सचिव रुपिंदर सिंग यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ.राजेश अडपावार, श्रीमती स्मिता शेलार यांच्यासह उपस्थित महाराष्ट्र सदनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्पअर्पण करून आदरांजली वाहिली.

## दलित पँथरमध्ये फुट पडली नसती तर महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले असते : ना.आठवले

मुंबई : दलित पँथर ही क्रांतीकारी संघटना स्थापन झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षात संपूर्ण जगात पोहचली होती. दलित पँथरमध्ये राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांचे दोन गट पडले. त्यानंतर राजा ढाले यांच्या गटातुन भाई संघारे, अविनाश महातेकर, दिलीप जगताप, हे बाहेर पडुन तिसरा गट स्थापन झाला. दलित पँथरमधील वाद एकत्र बसुन मिटवले असते, दलित पँथर एकसंघ राहिली असती. जर दलित पँथरमध्ये फुट पडली नसती तर महाराष्ट्राच्या राजकारणाला वेगळे वळण मिळाले असते असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहात रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळयात ना. रामदास आठवले प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी अविनाश महातेकर आणि



त्यांच्या पत्नी सौ. उल्का महातेकर यांचा ना. रामदास आठवले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दलित साहित्यातील कविता, कथा रक्तबंबाळ शब्दांनी व्यापलेले होते. दलित साहित्याच्या शब्दाशब्दात क्रांती ठासून भरलेली होती. मात्र प्रत्यक्ष क्रांतीसाठी साहित्यासोबत संघटनेची गरज असते. त्यामुळे दलित साहित्यीकांनी मिळून दलित पँथर या क्रांतीकारी आक्रमक संघटनेची स्थापना केली. दलित पँथरच्या स्थापनेच्या प्रवाहात अविनाश महातेकर सुध्दा प्रमुख नेते होते. दलित पँथरपासुन रिपब्लिकन पक्षापर्यंत ५० वर्ष अविनाश महातेकर यांनी आंबेडकरी चळवळीत स्वतला झोकुन दिले आहे. कार्यकर्ता, नेता, विचारवंत म्हणून तसेच साहित्यीक संपादक अशा विविध रुपात अविनाश महातेकर यांनी आंबेडकरी चळवळीत भरीव योगदान दिले आहे. त्यांचा अमृत महोत्सवी सत्कार माझ्या हस्ते होतोय याचा मला आनंद आहे असे ना. रामदास आठवले यावेळी म्हणाले.

अविनाश महातेकर, अर्जुन डांगळे हे जेवढी वर्षे प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत राहिली असतील त्यापेक्षा अधिक काळ ते माझ्या सोबत राहिले आहेत असे ना. रामदास आठवले म्हणाले. यावेळी राज्यभरातील हजारो रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी अविनाश महातेकर यांना अमृत महोत्सवी वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा दिल्या.

## सामर्थ्य आणि शक्तीचा योग्य वापर करण्याचा बोध स्वामी समर्थांनी दिला : केतकी माटेगावकर

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थाच्या अनेक लीला आहेत आणि यातून आपल्याला बरेच काही शिकायला मिळते. स्वामींनी आपल्या अलौकिक चमत्कारातून व प्रचितीतून प्रत्येकाला शिकवण दिली आहे असे आपण म्हणू शकतो. श्री स्वामी समर्थ पाठीशी असल्याने अनेक गोष्टीतून आपल्याला स्वामींच्या अस्तित्वाची प्रचिती आलेली आहे, म्हणून असे बोलावेसे वाटते की माझ्या सारख्या अनेक स्वामी भक्तांना स्वामींची प्रचिती आपल्यासाठी प्रेरक ठरते. याचा अनुभव भाविकांनी स्वामींच्या नामस्मरणातून घ्यावा. स्वामींच्या प्रचितीची अघाद महिमा आजवर अनेक वेळा अनुभवण्यास आलेले आहे. स्वामी समर्थांची अफाट भक्ती माझ्याकडे असल्याने स्वामींच्या कृपेने आपण गायन सेवेच्या माध्यमातून गाता गाता केव्हा अभिनय क्षेत्रात रुळलो कळलेच नाही. हे सामर्थ्य व ही शक्ती आपल्या अंगी असल्याची जाणीव स्वामी कृपेने झाली आहे. या अनुषंगाने अंगी असलेल्या सामर्थ्य व शक्तीचा योग्य वापर करण्याचा बोध स्वामीभक्तीतूनच मिळाल्याचे मनोगत सुप्रसिद्ध मराठी गायिका व अभिनेत्री केतकी माटेगावकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री



वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी केतकी माटेगावकर यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी माटेगावकर बोलत होत्या. यावेळी मंदिर समितीचे मंदार महाराज पुजारी, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, विपूल जाधव, संजय पवार, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

## निफाड ला भाजीपाला मार्केट ची मागणी

निफाड/ प्रतिनिधी : सध्या टोमॅटो सह भाजीपाला सिझन जोरात सुरू झाला असून तालुक्याचे गाव असलेल्या आणि लासलगाव बाजार समितीचे उपबाजार म्हणून प्रसिद्ध असलेल्या निफाड उपबाजार आवारावर कांदा .धान्य लीलावाव्यतिरिक्त कुठल्याही शेतमालाचे लिलाव होत नाहीत .निफाड परिसरात टोमॅटो .मिरची .भेंडी .मेथी . कोथमबिर गवार .भोपळा

दोडका . डांगर .सिमला मिरची . गिलके .यासह भाजीपाला . व फळभाज्यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते .सिन्नर बाजार समितीने नुकतेच हीवरगाव येथे भाजीपाला लिलाव सुरू केल्याने .तेथे मोठी आवक होवून निफाड सिन्नर या महामार्गावर वाहतुकीची कोंडी ही आता नित्याची बाब झाली आहे .तेथे उपबाजार सुरू झाल्याने परिसरात उद्योगधंदे जोर धरू लागले आहेत .निफाड हे तालुक्याचे ठिकाण असून येथे तालुक्यातील शेतकरी .ग्राहक .विद्यार्थी यांची नित्याची वर्दळ असते .कारण सर्व शासकीय कार्यालये .बँका खते औषधे . किराणा अगर कोणत्याही कामासाठी नागरिकांना निफाड येथे यावे लागते .त्यामुळे निफाड बस स्थानक जवळ असलेल्या उपबाजार आवारात भाजीपाला लिलाव सुरू केल्यास ते ग्राहक .शेतकरी .व्यापारी यांना सोईस्कर होईल .कारण याठिकाणी बाजार समितीची विस्तिर्ण जागा आहे .तसेच मोठमोठे शेड आहेत .संपूर्ण आवराचे कोंक्रटीकरण झालेले आहे .त्यामुळे धूळ . चीखल. अशी कोणतीही समस्या असणार नाही .त्यामुळे बाजार समिती संचालक मंडळाने याठिकाणी भाजीपाला मार्केट सुरू केले तर मार्केट कमिटी उत्पन्नात वाढ ही याबरोबरच शेतकऱ्यांना जवळची बाजार पेठ तयार होईल .त्यामुळे बाजार समितीने याठिकाणी लवकर भाजीपाला मार्केट सुरू करावे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे




## हन्नुर ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी

अक्कलकोट/गौतम बाळशंकरः हन्नुर ग्रामपंचायतीच्या वतीने महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री स्वच्छतेची शपथ घेऊन साजरी करण्यात आली.सरपंच सौ सोनाली तळवार यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी, सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर,ग्राम विकास अधिकारी सी.एल थोरात , सदस्य जयश्री भरमशेट्टी, अंगणवाडी सेविका अर्चना पत्की, नयाबाई बाळशंकर,ज्योती बाळशंकर, आशा सेविका मय्याव्वा बंदीछोडे, मनिषा बाळशंकर तुळसिराम इरवाडकर, सागर बंदीछोडे लक्ष्मण बाळशंकर आदी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अरविंद कोकाटे यांचे निधन

अक्कलकोट : येथील मराठा मंदीर संचलीत श्री शहाजी प्रशालेचे सेवानिवृत्त शिक्षक अरविंद शंकरराव कोकाटे यांचे आकस्मित निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात




पत्नी दोन मुले, एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा ३ ऑक्टोंबर २०२३ रोजी सकाळी ९ वा. विद्यानगर येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार आहे. अमोल कोकाटे सर व लोकमंगल बँकेचे संचालक अतुल कोकाटे यांचे वडील होत.

## महमंद पैगंबर जयंतीनिमित्त पंढरपूर शहरात मोठा जुलूस

## मोठ्या थाटामाटात निघालेल्या जुलूसामध्ये अभिजीत पाटील यांनी सहभाग नोंदवून केली साफसफाई..

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपुरात निघालेल्या महंमद पैगंबर जुलूस मोठ्या थाटामाटात निघाला असता हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांनी यामध्ये सहभाग नोंदवला होता.

यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने संत मुक्ताबाई मठासमोर स्वागत स्टेज व खाऊवाटप ठेवण्यात आलेला होता. याप्रसंगी श्री अभिजीत पाटील या ठिकाणी उपस्थित राहून प्रत्येकाला मलोमिलन



करून गळाभेटी घेत सर्वांना शुभेच्छा देत होते. जुलूस पुढे जात असताना पाठीमागे पडलेला कचरा व साफसफाई करून एक स्वच्छतेचा संदेश या ऊरूसातील सदस्य करत असताना यामध्ये श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी देखील सहभागी होऊन स्वच्छता करण्यासाठी हातभार लावला.

## अक्कलकोट काँग्रेस कमिटीच्या वतीने स्व,सातलिंगप्पा म्हेत्रे यांना विनम्र अभिवादन

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्याचे भीष्मपितामह,लोकनेते, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे शिल्पकार,चालते बोलते न्यायालय कै,स्व.सातलींगप्पा म्हेत्रे यांच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्त अक्कलकोट काँग्रेस कमिटीच्या वतिने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी शहराध्यक्ष बसवराज अल्लोळी,माजी नगरसेवक राम समाणे,उद्योजक काशीनाथ गोळळे, माजी नगरसेवक मैनुद्दीन कोरबु,जेष्ठ नेते नंदु कटारे, नामदेव



येकुळे,गुणवंत लवटे,सुभाष रेड्डी,गणेश मोरे, शिवशरण ईचगे,महेश येरटे,बबन पवार,बालाजी शापवाले,पंडित पवार,नेहरू पवारसह आदी उपस्थित होते.

## युवकांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी दिवसातील एक तास तरी द्यावा : साठे

पंढरपूर/प्रतिनिधी : व्यक्तींच्या सहवासात असल्याशिवाय त्यांच्या भावना समजून घेता येत नाहीत प्रत्येकाने ज्येष्ठांचीऔ आपली भावना संवर्धनशील ठेवावी तरुणांनी दिवसातील ज्येष्ठांसाठी एक तास तरी द्यावा हा तास कधी वाया जाणार नाही असे विचार शिवसेना सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे यांनी आपले व्यक्त केली पंढरपूर मध्ये ज्येष्ठ नागरिक कार्यक्रमात आलेल्या त्या कार्यक्रमात ती बोलत होती.

देशात आणि राज्यात ज्येष्ठ नागरिक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला याच दिनाचे औचित्य साधून रविवारी ज्येष्ठ नागरिकांचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते येथील हनुमान नगर मध्ये नाथ महाराजांच्या मठांमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास शेकडो ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी भजन गायन व त्यांच्या कलागुणांना वाव मिळवण्यासाठी संगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना संपर्कप्रमुख महेश साठी आवर्जून उपस्थित झाले होते त्यावेळी त्यांच्या हस्ते



कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली ज्येष्ठ नागरिकांबरोबर वेळ झाल्यानंतर त्यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी दिलीप टोमके कुलकर्णी आराध्य मॅडम उत्पाद साहेब यांच्यासह इतर ज्येष्ठ नागरिक मान्यवर उपस्थित होते ज्येष्ठ नागरिकांना सहानभूतीची अतिशय गरज असते एकाकीपणा त्यांना नकोसा वाटतो एकाकी पडल्यामुळे त्यांच्या चिडचिडेपणा किती त्यामुळे त्यांना सहानभूतीची गरज असते प्रत्येक तरुणाने ज्येष्ठ नागरिकांसाठी आपली संवेदनशील भावना भावना ठेवून त्यांना दिवसातून एक तास तरी द्यावा हा तास कधी वायफळ जाणार नाही .